ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# उपयोजित मराठी : गरज व अभ्यासक्रमातील विविधता

डॉ. तानाजी अं. देशमुख
मराठी विभागप्रमुख, वसुंधरा कला महाविद्यालय, जुळे सोलापूर.

## प्रस्तावना




संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील ''शब्द चि आमुच्या जीवाचें जीवन '' या उक्तीव्दारे भाषा हेच माणसाचे जीवित आहे. भाषेशिवाय माणसास अस्तित्वच नाही, असे चिरंतन सत्य तुकाराम महाराज यांनी सांगितले आहे. माणूस भाषा जशी आत्मसंवादासाठी वापरत असतो तशीच ती तो इतरांशी, समाजाशी संवाद करण्यासाठी वापरत असतो. आपल्या मनातील भावना किंवा विचार इतरांपर्यंत व्यवस्थितपणे पोचविण्यासाठी भाषेचा व्यवस्थित, बिनचूक वापर करता यावा लागतो , हे महत्त्वाचे आहे.

सोलापूर विद्यापीठ,सोलापूर अंतर्गत मराठी अभ्यासमंडळाने एम.ए. भाग -१ साठी ' मराठी भाषा : संवाद व उपयोजन' ही अभ्यासपत्रिका लावली आहे. मला असे वाटते की तुकाराम महाराजांच्या वरील अभंगातील विचारसूत्र आपणांस केंद्रस्थानी ठेवून या अभ्यासपत्रिकेबाबत विचार करावा हवा. मी मराठी अभ्यासक्रमातील उपयोजित मराठी ची गरज , स्वरुप व व्याप्ती या अनुषंगाने माझे विचार प्रसूत करण्याचा प्रयत्न करणार आहे.

## उपयोजित मराठी : गरज

आपण आज शिक्षण व नोकरी किवा व्यवसाय यांची अतूट सांगड घालून बसलो आहोत. अर्थातच नोक-या नि व्यवसाय यांची संधी उपलब्ध करून देणारे शैक्षणिक कार्यक्रम किंवा नोकरी-व्यवसायाजोगती अशीच क्षमता उत्पन्न करू शकणारे अभ्यासक्रम राबवणे गरजेचे झाले आहे. असा अभ्यासक्रम तयार करतांना आपल्या समाजाची नेमकी गरज काय व किती मनुष्यबळाची आहे. याचा अंदाज घेणे आवश्यक असते. ही गरज आज अनेक विद्यापीठांनी उपयोजित मराठी चा अभ्यासक्रम , अध्ययन- अध्यापन आणि मूल्यमापन याबाबतची आपली पारंपरिक चौकट सोडून भागविली आहे. आज साहित्य व भाषा शिकणा-यांना नोक-याच मिळत नाहीत अशी आरडाओरड चालू आहे. परंतु, माध्यमातील दूरचित्रवाणी, आकाशवाणी आणि वृत्तपत्रव्यवसाय, प्रकाशन व्यवसाय, जाहिरात व प्रसिध्दी व्यवसाय इत्यादी जनसंपर्क क्षेत्रातील अधिकारी प्रतिभावान मंडळीच्या, साहित्याचा व भाषेचा चांगला अभ्यास असणा-या मंडळीच्या प्रतीक्षेत आहेत. अशी आज परिस्थिती आहे. त्यांना साहित्याची व भाषेची जाण असणारे संहिता संपादक हवे आहेत. त्यांना चांगले जाहिरात संहिता लेखक हवे आहेत, त्यांना चांगले भाषांतरकार हवे आहेत, त्यांना चांगले मराठी संवाद संभाषण करू शकणारे प्रचारक व प्रसिध्दी अधिकारी हवे आहेत. आणि ते मिळत नाहीत. आज ही गरज मराठी भाषा : संवाद व उपयोजन या अभ्यासपत्रिका ने भागविली जाण्याची शक्यता आहे.

## उपयोजित मराठीचे उपयोजन :

माणूस एकटा , एकाकी, अपरावलंबी कधीच राहू शकत नाही. त्याचा दुस-या व्यक्तीशी, दुस-या गटाशी, शासकीय वा अशासकीय यंत्रणेशी संबंध येत राहतो. हा संबंध बरेचदा लिखीत स्वरूपात व्यक्त करण्याची गरज पडते. अशा वेळी ही लिखीत रूपे कशी असावीत (मुख्य म्हणजे कशी नसावीत ) याचे काही सामाजिक संकेत असतात. या

संकेतांच्या पालनासंदर्भात जी मराठी भाषा वापरावी लागते, ती उपयोजित मराठी होय. आपला जीवनव्यवहार परिपूर्ण, सुखकर आणि उभयपक्षी समाधानकारक होण्यासाठी ज्या प्रकारची मराठी भाषा वापरावी लागते, त्या प्रकारच्या मराठीला उपयोजित मराठी म्हणता येईल.

### उपयोजित मराठी भाषेकडून अपेक्षा:

१) व्यवहार सुकर होण्याची अपेक्षा असते
२) तो पूर्ण होण्याची अपेक्षा असते
३) ती मराठी भाषा पुरेशी परिणामकारक असावी लागते.

### मराठी भाषेचे उपयोजन करतांना घ्यावी लागणारी दक्षता :

१) स्पष्टार्थ :- भाषा स्पष्टार्थबोधक असली पाहिजे
२) निश्चितार्थ :- निवेदित करावयाचे आहे ते नेमके निवेदित करावे
३) नि:संदिग्धता :- निवेदनासाठी उपयोजिली जाणारी भाषा संदिग्ध असू नये
४) काटेकोरपणा :- भाषेमुळे जास्त काही निवेदित केले जाऊ नये, किंवा अर्थ चोरून ठेवला जाऊ नये.

### 'मराठी भाषा : संवाद व उपयोजन 'या अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे :

ही अभ्यासपत्रिका अभ्यासक्रमासाठी लावत असतांना मराठी अभ्यास मंडळांनी खालील उद्दिष्टे नमूद केलेली आहेत .याचा विचार करणे आवश्यक आहे.

१) भाषिक संवादाचे महत्त्व समजावून सांगणे
२) संवादाच्या विविध घटकांचा व माध्यमांचा परिचय करून देणे.
३) शासन व प्रशासनाची कार्यप्रणाली समजवून घेणे.
४) संवादाचे व माध्यमांचे सामाजिक, सांस्कृतिक जीवनातील योगदानाचे स्वरूप स्पष्ट करणे.

वरील उद्दिष्टांचा विचार केल्यानंतर आपणांस या अभ्यासपत्रिकेचे अध्यापन व अध्ययन करतांना प्रत्येक घटकांमध्ये काय दिलेले आहे. विद्यार्थ्यांकडून काय अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांना काय माहीत होण्याची अपेक्षा आहे. हे स्पष्ट होते.

### अभ्यासपत्रिकेतील घटक :

या अभ्यासप्रत्रिकेचे प्रथम सत्र व व्दितीय सत्र असे दोन भाग असून प्रत्येक सत्रात तीन तीन असे एकूण ६ घटक आहेत.

**प्रथम सत्रामध्ये**

१) संवादाची मूलतत्त्वे
२) वक्तृत्व : तंत्र आणि कौशल्य
३) वृत्तपत्रीय संवाद

**व्दितीय सत्रात**

१) आकाशवाणीवरील संवाद
२) दूरचित्रवाणीवरील संवाद या अंतर्गत अ) दूरचित्रवाणी : स्वरुप व कार्य ब) इंटरनेट
३) प्रशासकीय संवाद. असे घटक आहेत.

### प्रथम सत्र

### १) संवादाची मूलतत्त्वे-

या घटकात बोलणे (संभाषण- भाषण),ऐकणे(श्रवण), लिहिणे (लेखन) ,वाचणे (वाचणे) ही संवादाची चार मूलभूत कौशल्य आहेत . त्यांच्या स्वरूपाचा अभ्यास अपेक्षित आहे.

१. संवाद :- व्यक्तीव्यक्तींमधील सहेतुक अर्थपूर्ण संपर्क
२. संभाषण- भाषण :- व्यक्तीव्यक्तींमधील मौखिक आंतरक्रिया, सुश्राव्य बोलणे समजेल अशी जुळणी करून बोलणे
३. श्रवण :- व्यक्तीव्यक्तींमधील मौखिक आंतरक्रिया . बोललेले किंवा वाचलेले ससंदर्भ उमजून ऐकणे.

४. लेखन :- सुवाच्य लिहिणे, अर्थ समजेल अशी जुळणी करून लिहिणे.
५. वाचन :- लिहिलेले डोळयांनी पाहून उच्चारणे, लिहिलेले अर्थ नीट लक्षात घेऊन वाचणे.

### २) वक्तृत्व : तंत्र आणि कौशल्ये :-

वक्तृत्व हे व्यक्तिमत्वाच्या अभिव्यक्तीचे महत्त्वाचे कौशल्य आहे. माणसाच्या बोलण्यातून त्याची संस्कृती सभ्यता, चिंतन, अभ्यास, बहुश्रुतता या सर्वांचा प्रत्यय येतो. बोलणा-या माणसाला जग जिंकता येते. वक्तृत्वाने राजकीय महत्त्वकांक्षा, सामाजिक प्रतिनिधित्व , उच्चपदस्थ प्रसार माध्यमातील नोकरी , चांगला अभिनेता बनण्याची संधी, चांगला वृतनिवेदक, समालोचक, निरुपणकार, सुत्रसंचालनकर्ता अशा अनेक भुमिकांमध्ये यश संपादन करता येते म्हणून हा घटक विद्यार्थ्यांच्या दृष्टिने अत्यंत महत्त्वाचा आहे. असे मला वाटते.

वक्तृत्व साधना विकसित करण्याचे प्रयत्न करतांना प्रथम स्पष्ट बोलणे आणि उच्चारण महत्त्वाचे असते. स्पष्ट शब्दांचे उच्चारण, स्पष्ट विधानांचे प्रकटीकरण महत्त्वाचे असते. यासाठी प्रमाणभाषेतील शब्द आणि वाक्यांच्या उच्चारणाचा सराव करणे गरजेचे आहे. चिंतन, मनन, अभ्यास, सामाजिक सहभाग , देशाटन,विद्वानांच्या परिषदांमधील सहभाग, प्राथमिक स्तरांवरील वक्तृत्व स्पर्धामधील सहभाग इ. गोष्टी महत्त्वाच्या असतात. शब्दसाधना करताना अनेक शब्दसंग्रह आणि त्यांचे अर्थ समजावून घेणे ,अनेक शब्दांचे पर्यायी शब्द शोधणे . वक्तृत्व कलेत विधानांचे सातत्य, विधानातील ओघवतेपणा, विधानांतील निसंदीग्धताही महत्त्वाची असते. यासाठी वक्त्याकडे अनेक सुभाषितांचा संग्रह, प्रसिध्द विधानातील संग्रह, प्रसिध्द व्यक्तीच्या तत्ववेत्यांच्या विधानांचा संग्रह वक्तृत्व साधनेसाठी महत्त्वाची आहेत.

### ३. वृत्तपत्रीय संवाद

या घटकात वृत्तपत्रीय माध्यमाचे महत्त्व आणि या माध्यमांसाठी केल्या जाणा-या लेखनाचे स्वरूप याचा एकत्रित विचार केला आहे. हा अभ्यास वृत्तपत्रीय(मुद्रित) माध्यमात प्रकाशित होणा-या लेखनावर अनेक बाजूंनी प्रकाश टाकणारा आहे. विद्यार्थ्यांना या घटकांमुळे वृत्तपत्रीय माध्यमांसाठी लेखन कसे करावे , या लेखनासाठी कोणती कौशल्य वृध्दिंगत करावीत याचे मार्गदर्शन मिळणार आहे. वृत्तपत्र या प्रभावी माध्यमासाठी लेखन करायचे असेल, तर या माध्यमांच्या स्वरुपाचा आणि वैशिष्टयांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. ही गरज ओळखून आपल्या विद्यापीठाने या घटकाचा समावेश अभ्यासक्रमात केला आहे.

प्रामुख्याने वृत्तपत्राच्या इतिहासाचा काळ सुमारे २०० वर्षाचा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. हा कालखंड १८३२ ते २०१६ साधारणतः १८० वर्षाचा आहे. दर्पण पासून सुरु झालेला वृत्तपत्रांचा प्रवाह आजही सुरू आहे.

### मराठी वृत्तपत्राच्या इतिहासाचे दोन कालखंड पडतात.

१. १८३२ ते १९४७ :- हा कालखंड फारच मोठा आणि वैविध्यपूर्ण आहे. राजकीय चळवळ आणि सामाजिक भूमिका यांचा संघर्ष असलेला हा कालखंड.
२. १९४७ च्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आजपर्यंत :- या काळात वृत्तपत्रांनी लोकशाहीला बळ देणारी आणि समाजाच्या उभारणीची भूमिका घेतली. त्यावेळचे नवे वातावरण, लोकशाही संस्थांची उभारणी, त्यांचा विकास, देशाच्या नेतृत्वाने दिलेली विज्ञानवादी दृष्टी यामुळे भारतीयांचे क्षितीज विस्तारून गेले.जाती-धर्माच्या, भाषेच्या प्रश्नावरील दंगली, चीन आणि पाकिस्तानाचे आक्रमण, भूकंपासारखी संकटे, अन्नधान्याची टंचाई, दुष्काळाचे चटके, ग्रामीण भागातून झालेले स्थलांतर, रोजगार हमी योजनेची सुरूवात असे अनेक संदर्भ येथे येतात.
   वृत्तपत्रांनी निर्माण केलेल्या, जागवलेल्या, विकसित केलेल्या नव्या जाणिवा व अग्रलेख, बातमी लेखन, स्तंभलेखन, वृत्तांत लेखन, वार्तापत्र, जाहिरातीचे महत्त्व आणि इंटरनेट आणि वृत्तपत्रे यांचा तपशीलवार अभ्यास या प्रकरणात अपेक्षित आहे.

## व्दितीय सत्र

### १. आकाशवाणीवरील संवाद :-

आकाशवाणी हे अतिशय सुलभ, स्वस्त व सर्वांना उपलब्ध होणारे महत्त्वाचे लोकसंपर्काचे साधन आहे. भारतीय लोकशाही देशामध्ये उद्‌बोधक व रंजक कार्यक्रम ' बहुजन हिताय व बहुजन सुखाय ' केले जातात. आकाशवाणीवरून होणा-या या संवादाचे स्वरूप आणि त्यासाठी लागणारी विविध कौशल्ये यांचे अध्यापन व अध्ययन या घटकामध्ये आले आहे. बातमीपत्र, वेगवेगळया प्रकारच्या उद्‌घोषणा, अनेक मान्यवरांच्या घेतलेल्या मुलाखती, परिसंवाद, श्रुतिका व

नभोनाटय असे आकाशवाणीवरून श्रोत्यांशी संवाद साधणारे महत्त्वाचे प्रकार आहेत. त्यासाठी संहिता तयार कराव्या लागतात. प्रत्येकाचे वेगळे वैशिष्टे असतात, यांचा अभ्यास या घटकात होतो.

### २.दूरचित्रवाणीवरील संवाद :-

दूरचित्रवाणी या माध्यमातील लेखन कौशल्यांचा अभ्यास आपल्याला या घटकांतर्गत करावयाचा आहे. इलेक्ट्रॉनिक मिडियाने अवघे विश्वच पादाक्रांत केले आहे. संपूर्ण जगातील माहिती दूरचित्रवाहिन्या आणि संगणकाव्दारे आपल्या घरा-घरात पोहचत आहे. या माहिती जालामुळे आपण विश्वाचे अविभाज्य घटक बनत आहोत. बातम्या, मालिका लेखन, चर्चासंचलन, कार्यक्रम यांचे संहिता लेखन महत्त्वाचे आहे. तसेच परदेशी चालीरीती, भाषा आणि संस्कार, समाज आणि शासन पध्दतीचा परिचय होत आहे.

### ३. प्रशासकीय संवाद :-

या घटकात आपण पत्रलेखनासंबधी माहिती घेणार आहोत. पत्र म्हणजे लेखीस्वरुपातील संवाद होय. पत्र हे ललित आणि व्यवहारोपयोगी अशा दोन्ही प्रकारांत महत्त्वाचे ठरते. आज माध्यमक्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे दूरध्वनी, भ्रमरध्वनी, इंटरनेट अशी संवादाची आधुनिक साधने उपलब्ध झाली असली तरी पत्रलेखनाचे महत्त्व कमी झाले नाही. या विभागाचे अध्ययन करतांना पत्रव्यवहाराचे मूळ मनुष्याच्या सामाजिकतेत आहे. समाजाचा सदस्य या नात्याने व्यक्ती अन्य व्यक्तींशी प्रेम, कर्तव्य या भावाने जोडलेली असते . त्याचप्रमाणे काही व्यावहारिक गरजांची पूर्तता करण्यासाठी माणसे एकमेंकांशी जोडलेली असतात. त्यामुळे केवळ परिचित व निकटच्या व्यक्तींशीच नव्हे तर ज्यांच्याशी तिचा जुजबी, तात्पुरता वा कामापुरता संबंध आहे. त्यांच्याशीदेखील व्यक्तीला संवाद साधावा लागतो. यासाठी पत्र हे अनेक पातळयांवर उपयुक्त ठरणारे संवादाचे साधन आहे. हे अध्यापकांनी लक्षात घेणे गरजेचें ठरते.

देशांतर आणि कालांतर यांचे तारतम्य ठेवून केलेला लेखनरुप संवाद म्हणजे पत्रव्यवहार होय अशी आपणांस पत्रव्यवहाराची व्याख्या करता येईल. या घटकात. प्रत्रलेखनाचे प्रकार, कार्यालयीन प्रत्रव्यवहाराचे उपप्रकार,कार्यालयीन टिप्पणी: हेतू, प्रकार , लेखन पध्दत, आवक - जावक याचा अभ्यास करावयाचा आहे.

### उपयोजित मराठी : नव्या कक्षा

आज २१ व्या शतकात आपले जीवन बंदिस्त राहिलेले नाही. आपली इच्छा असो वा नसो अनेक प्रकारच्या जीवनव्यवहारांशी आपला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध येतो आहे. एका बाजूने अतिव्यापक , सर्वस्पर्शी आणि वेगवान अशी Electronic medias आणि दुस-या बाजून जागतिकीकरणाचा रेटा वाढला आहे. यामुळे जीवनव्यवहाराला बहुविध व बहुव्यापक अशा कक्षा लाभलेल्या आहेत. अशा अत्यंत कठीण प्रसंगी माय मराठीची व्यावहारिक उपयोजन क्षमता आपण दक्षतेने आणि कसून वापरण्याची गरज आहे. मराठी भाषा ही आपल्या नित्य व नैमित्तिक व्यवहारांना पुरून उरणारी भाषा आहे.

### संदर्भग्रंथ :-

१. नसिराबादकर ल.रा.- व्यावहारिक मराठी, फडके प्रकाशन, कोल्हापूर
२. गवस,राजन व इतर (संपा.)- भाषिक सर्जन आणि उपयोजन, दर्या प्रकाशन, पुणे.
३. मारवाडे, नरेंद्र-उपयोजित मराठी, कैलास पब्लिकेशन्स, औरगांबाद.